J6

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** उंब्रज **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0232 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/04/2021 21:13 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 28/04/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/04/2021

**Time From (वेळेपासून):** 12:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/04/2021 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/04/2021 21:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 8 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय मसुर ,मौजे मसुर ता कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ऋषिकेश दिलीप मोहिते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2002 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 69, विजयशांती सुरेश्वर नगर,पाल रोड, जोधपुर, ,राजस्थान ,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | निगडी, ता कराड,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | निगडी, ता कराड,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निलेश सुरेश प्रभुणे | | | 1. प्लट नं 17,,रामकष्ण नगर हौसिंग सोसायटी,संगमनगर, मलकापुर, कराड, ,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रविकिरण अशोक वाघमारे | | | 1. मसुर, ता कराड,,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)**):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)**):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (**प्रथम खबर हकीकत **):**

खबरी जबाब दिनांक 28/04/2021मी, ऋषिकेश दिलीप मोहिते, वय 19 वर्षे, शिक्षण 12 वी पास, व्यवसाय - शिक्षण, मुळ राहणार - मु.पो. निगडी, ता. कराड, जि. सातारा, सध्या राहणार - 69, विजयशांती सुरेश्वर नगर, पाल रोड, जोधपुर, राजस्थान मोबाईल नंबर - 8290380875 समक्ष उंब्रज पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी राहणेस असुन माझे शिक्षण 12 वी झाले असुन मला मराठी, हिंदी, इंग्रजी व राजस्थानी भाषांचे ज्ञान असुन त्या मला लिहीता व वाचता येतात. मी जोधपुर येथे माझे आई व वडीलांसोबत राहणेस आहे. माझी परीक्षा झाल्याने मी मुळ गाव निगडी येथे माझे आजोबा उत्तम आनंदराव मोहीते यांचेकडे आलो आहे. माझे मुळ गावी माझे आजोबा व आजी असे दोघेजण राहणेस असुन ते दोघेही वयोवृध्द आहेत. माझे आजोबांचे नावे मसुर, ता. कराड, जि. सातारा येथे गट नंबर 695 अ मध्ये 0.95 गुंठे जमीन आहे. माझे आजोबा वयोवृध्द असल्याने त्यांचे औषधोपचारासाठी व त्यांचे उदरनिर्वाहासाठी त्यांना सदरची जमीन विकण्याची असल्याने सदर जमीनीचा सर्च रिपोर्ट काढण्यासाठी सातबारा उतान्याची आवश्यकता असल्याने तसेच आजोबांना वयोमानाने बाहेरगावी जाता येत नसल्याने व कोरोनाचे वाढते प्रभावामुळे सदर जमीनीचे विक्रीची जबाबदारी आजोबांनी माझ्यावर दिली आहे. मी आज रोजी मसुर तलाठी कार्यालयामध्ये सातबारा उतारा व सर्च रिपोर्ट काढण्यासाठी गेलो असता तलाठी रवि यांनी मला सांगितले की, सातबारा व सर्च रिपोर्ट असा मिळत नाही त्यासाठी काय तरी खर्च करावा लागतो, त्यावर मी त्यांना, काय खर्च करावा लागेल असे विचारले. त्यावर तलाठी रवि यांनी, तीन हजारा शिवाय काम होत नाय, तु आहेस म्हणुन दोन हजार रुपये आणुन दे आणी सातबारा उतारा घेवुन जा असे सांगितले. त्यावर मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.तरी मसुर गावचे तलाठी रवि यांनी मला माझे आजोबा उत्तम आनंदराव मोहीते यांचे नावे मसुर, ता. कराड, जि. सातारा येथील गट नंबर 695 अ मध्ये 0.95 गुंठे जमीनीचा सातबारा उतारा व सर्च रिपोर्ट देण्यासाठी माझ्याकडे तीन हजार रुपयांची मागणी करुन दोन हजार रुपये आणुन देण्यास सांगितल्याने मी त्यांना आज रोजी दोन हजार रुपये नेवुन देणार आहे व सातबारा उतारा तसेच सर्च रिपोर्ट घेणार आहे. तरी त्यांचेत व माझेत कोणतीही आर्थीक देवाणघेवाण नसुन पुर्ववैमनस्य नाही. तरी मसुर गावचे तलाठी रवि यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.मसुर तलाठी कार्यालय येथील तलाठी रवी हे 2000/- रुपये घेतल्याशिवाय माझे आजोबा उत्तम आनंदराव मोहीते यांचे नावे मसुर, ता. कराड, जि. सातारा येथील गट नंबर 695 अ मध्ये 0.95 गुंठे जमीनीचा सातबारा उतारा व सर्च

रिपोर्ट देणार नाही अशी माझी खात्री झाली, म्हणुन मी, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात दिनांक 27/04/2021 रोजी फोन करुन पोलीस उपअधीक्षक श्री. शिर्के, यांना माझी वरील प्रमाणे तक्रार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 27/04/2021 रोजी 16.00 वाजता मसुर गावचे अलीकडे उंब्रज - मसुर रोडवरील रेल्वे फाटकाचे अलीकडे रस्त्यावर येवुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर दिनांक 27/04/2021 रोजी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मसुर गावचे अलीकडे उंब्रज - मसुर रोडवरील रेल्वे फाटकाचे अलीकडे रस्त्यावर येवुन माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, हे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व म.रा.वि.वि.कंपनी मर्या. कृष्णानगर सातारा या कार्यालयातील 1) विष्णु बाळु कोकरे, कनिष्ठ सहायक व 2) प्रसाद शरद भागवत, उच्चस्तर लिपीक या दोन पंचासह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी, माझा लेखी तक्रारी अर्ज शिर्के साहेबांकडे हजर केला. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन विष्णु कोकरे व पंच नं. 2 म्हणुन प्रसाद भागवत यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं. 1 यांचेसोबत तलाठी रवी यांची भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये माझी व मसुर तलाठी कार्यालयातील तलाठी रवी तसेच आण्णा नावचे इसम यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी प्रथम तलाठी रवि यांनी माझे आजोबा उत्तम आनंदराव मोहीते यांचे नावे मसुर, ता. कराड, जि. सातारा येथील गट नंबर 695 अ मध्ये 0.95 गुंठे जमीनीचा सातबारा उतारा व सर्च रिपोर्ट देण्यासाठी माझ्याकडे दिड हजार (1500/-) रुपयांची मागणी करुन लागलीच आणुन देण्यास सांगितली तसेच मसुर तलाठी कार्यालयातील कर्मचारी आण्णा इसम यांनी तलाठी रवि हे लाच मागणी करीत असल्याचे माहीत असुन तेथे थांबुन माझ्याकडे 2000/- रुपयांची लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम तलाठी रवि यांचेकडे देण्यास सांगितल्याची रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 2000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन तलाठी रवी यांची भेट घेण्याकामी मसुर तलाठी कार्यालय येथे रवाना केले. आयोजित केले सापळा कारवाईमध्ये माझी व तलाठी रवी यांची भेट झाली नाही. त्या ठिकाणी मी, तेथील इसमाकडे तलाठी रवी यांचेबाबत चौकशी केली असता त्या इसमाने येणार हायत उद्या, आत्ताच गेल्यात असे सांगितल्याची शिर्के साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांनी दि. 28/04/2021 रोजी सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले त्याबाबतचा दि.27/04/2021 रोजी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा मागे घेतलेबाबतचा पंचामाना करण्यात आला आहे.त्यानंतर दिनांक 28/04/2021 रोजी श्री. शिर्के साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे मसुर गावचे अलीकडे उंब्रज - मसुर रोडवरील रेल्वे फाटकाचे अलीकडे रस्त्यावर आल्यानंतर श्री.शिर्के साहेब यांनी मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 2000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन तलाठी रवी व आण्णा इसम यांची भेट घेण्याकामी मसुर तलाठी कार्यालय येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 असे माझ्या दुचाकी वाहनावरुन मसुर गावातील तलाठी कार्यालयाचे समोर गेलो. त्याठिकाणी मी, माझेकडील वाहन पार्क केले. त्याठिकाणी तलाठी कार्यालयाचे इमारतीचे शटर बंद असल्याने मी माझ्या मोबाईल फोनवरुन तलाठी रवी यांना फोन लावुन कार्यालयाचे समोर आल्याचे सांगितले. त्यावेळी तलाठी रवी यांनी एक तासात येत असल्याचे सांगितले. त्यामुळे मी व पंच नं. 1 असे आम्ही दोघेजण तलाठी रवी यांची येण्याची वाट पाहत थांबुन राहीलो. काहीवेळाने तलाठी रवी हे कार्यालयाचे समोर आले व त्यांनी कार्यालयाचे शटर उघडुन ते कार्यालयात गेले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे जीना चढुन कार्यालयात गेलो. त्यावेळी मी, ओ, सर गुड मर्निंग, काल आलेलो मी तुम्ही नव्हता असे तलाठी रवी यांना म्हणालो. त्यावर तलाठी रवी यांनी सहया घ्यायच्या त्या पाच लोकांच्या त्या, आ हित आहेत नाव, नाव टाक अन सहया घ्या, सही करा हित नाव टाकुन सही करा असे म्हणुन त्यांनी तेथील कार्यालयातील दोन इसमांना त्यांची नावे विचारुन एका कागदावर सहया घेतल्या व पंच नं. 1 यांना त्यांचे नाव विचारुन त्यावर त्यांची सही घेतली. त्यावर पंच नं. 1 यांनी विष्णु बाळु मोहिते हे नाव टाकुन तशी खोटी सही केली. त्यानंतर तो कागद तलाठी रवी यांनी माझ्याकडे देत हे, घे, हित दोन नाव टाक कोणाची तरी, सही घे असे म्हणाले, त्यावर मी, ठिक हाय असे म्हणुन तो कागद माझ्याकडे घेतला. त्यावेळी तलाठी रवी यांनी माझ्याकडे पाहुन त्यांचा डाव्या हाताचा अंगठा तर्जनिवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा करीत झाल काम असे म्हणाले, त्यावेळी मी, माझ्या उजव्या हाताने माझे शर्टचा छातीवरील डाव्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम काढुन तलाठी रवी यांचेसमोर धरत हि घ्या, तुम्ही बोलल्याप्रमाणे, दोन हजार रुपये ठिक हाय असे म्हणालो. त्यावर तलाठी रवी यांनी माझ्याकडुन दोन हजार रुपये लाच रक्कम डाव्या हातने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन ती त्यांचे समोरचे टेबलाचे उजव्या बाजुचे ड्रवरमध्ये ठेवुन जा, सहया तेवढया घे असे म्हणाले, त्यावर मी हो, सर असे म्हणुन कार्यालयाचे जिना उतरुन खाली येवुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन श्री. शिर्के व पथक माझ्या जवळ आले. श्री. शिर्के साहेबांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला व मला थोडे बाजुला थांबण्यास सांगितले. काही वेळाने श्री. शिर्के साहेबांनी मला, तलाठी कार्यालयात बोलावुन माझी अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील डाव्या खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिर्के साहेब यांनी मला माझ्या शर्टच्या छातीवरील डावे खिशात ठेवलेल्या लाच रकमे बाबत विचारता मी 2000/- रुपये लाच रक्कम तलाठी रवि यांनी मागणी केले प्रमाणे त्यांना दिली असल्याचे सांगुन अधिक सांगितले की, तलाठी रवी यांनी पंचमजदुरचा दाखला व त्यासोबत सातबारा उतारा दिला असल्याचे सांगितले. त्यावेळी मी, पंचमजदुरचा दाखला व साताबारा उताऱ्याची नक्कल शिर्के साहेब यांचेकडे हजर केली.त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी मला कळविले की, तलाठी रवी हा मसुर गावचे तलाठी नसुन तलाठी प्रभुणे यांचे हाताखाली काम करणारे खाजगी मदतनिस असल्याचे सांगुन दिनांक 27/04/2021 रोजी आण्णा नावचा इसम हा तलाठी प्रभुणे असल्याचे सांगुन खाजगी इसम यांचे नाव रविकिरण वाघमारे असल्याचे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांची तलाठी कार्यालयातच तपासणी केली त्यावेळी त्यांचे दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळ हातास तसेच खाजगी इसम वाघमारे यांचे समोरील टेबलचे उजव्या बाजुचे ड्रवरचे आतील बाजुस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी रविकीरण वाघमारे खाजगी इसम यांना ताब्यात घेवुन सर्व पथकासह खाजगी वाहनाने प्राथमीक आरोग्य केंद्र मसुर कडे गेले. तसेच मी, श्री. शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे दाखल झालो.काहीवेळाने श्री. शिर्के साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक असे खाजगी इसम वाघमारे यांना ताब्यात घेवुन शासकिय वाहनाने व खाजगी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात दाखल झाले. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला कार्यलयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळाने एसीबी कार्यालय सातारा येथे आण्णा नावचे इसम हजर झाले. त्यावेळी श्री.शिर्के साहेब यांनी मला व पंच नं. 1 कोकरे यांना त्यांचे कक्षात बोलावुन

घेतले. त्यावेळी मी व पंच नं. 1 यांनी आण्णा नावचे इसमास ओळखले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब यांनी त्या आण्णा नावाचे इसमाचे नाव निलेश सुरेश प्रभुणे, नोकरी - तलाठी, मसुर सजा, ता. कराड, राहणार - प्लट नं 17, रामकृष्ण नगर हौसिंग सोसायटी, संगमनगर, मलकापुर, कराड, ता. कराड,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Ajay Gorad (I (Inspector)) / Pobn84262 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Hrishikesh

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Ajay Gorad
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): Pobn84262

पोलीस स्टेशन अधिकारी
उंब्रज पोलीस स्टेशन